


ISSN 2279 - 0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF-YEARLY RESEARCH JOURNAL




# GENIUS





Volume – V
Issue – II
February – July – 2017



Ajanta Prakashan

ISSN 2279 - 0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

VOLUME - V ISSUE - II FEBRUARY-JULY - 2017 AURANGABAD

| IMPACT FACTOR - 2016 |
| --- |
| 4.248 |
| www.sjifactor.com |

✦ EDITOR ✦

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**

M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),

M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

✦ PUBLISHED BY ✦

Ajanta Prakashan

Aurangabad. (M.S.)

56

## CONTENTS



| Sr. No. | Name & Author | Pages |
|---|---|---|
| ९ | म. फुले यांचा स्त्री – विषयक दृष्टीकोण आणि कार्य<br>प्रा. डॉ. स्मिता शिंदे | ३२-३५ |
| १० | अजिंठा लेण्यातील नऊ क्रमांकाच्या गुंफेतील भितीचित्रांचे तत्कालीन सिलोन देशाशी असलेले नाते<br>सौ. राधिका सुधीर टिपरे | ३६-३९ |
| ११ | नामांतर चळवळीत धुळे जिल्ह्याचा सहभाग<br>भुषण शांताराम वानखेडे<br>प्रा. डॉ. सुनिल चंद्रकांत अमृतकर | ४०-४५ |
| १२ | उत्तरेकडील भक्तिपंथाची वाटचाल : शंकराचार्य यांच्या संदर्भात<br>प्रा. फेरोज कदिर देशमुख | ४६-४८ |
| १३ | नाटककार - राम गणेश गडकरी<br>प्रा. डॉ. सुनंदा किसनराव रेवसे | ४९-५१ |

१३

# नाटककार - राम गणेश गडकरी

प्रा. डॉ. सुनंदा किसनराव रेवसे

राम गणेश गडकरी यांनी उणीपूरी ४/५ नाटके लिहून मराठी नाट्यसृष्टीला आपल्या अपूर्व वैशिष्ट्यांनी संपन्न बनविले. १८८५ ते १९२० या काळातील मराठी नाटक आणि रंगभूमी ज्या नाटककारांनी गाजविली. त्या नाटककारांत गडकरी हेच खऱ्याअर्थाने अनभिषिक्त सम्राट शोभतात. गडकऱ्यांचे हे वर्णन केवळ अलंकारिक नाही तर त्यांच्या नाटकांनी मराठीतील नाट्यवस्तुला ज्या प्रकारे विकसनाच्या दृष्टिने पुढे नेले त्यामुळे त्यांना हा बहुमान प्राप्त झाला आहे.

गडकऱ्यांनी -'प्रेम संन्यास पासून एकच प्याला' पर्यंत मराठी नाट्यवस्तुचा ज्या अंगांनी विकास केला ती अंगे अजूनही आपले अपूर्वत्व आणि वेगळेपण जपून आहे. नाटककार म्हणून गडकऱ्यांची जी सामर्थे आहेत ती कुठे पूर्ण स्वरुपात तर कुठे अपूर्ण स्वरुपात तर कुठे नुसतीच अस्फूट अशा अवस्थेत त्यांच्या नाटकातून प्रकटली आहेत. एकूण मराठी नाट्यपरंपरेचा विचार करता गडकऱ्यांच्या या सामर्थ्यांची दखल पाहिजे तशी समीक्षकांनी, त्यांचा वारसा सांगणाऱ्या वारसदारांनी सहीसही घेतलेली दिसत नाही. एकूणच गडकऱ्यांना त्यांच्या नाट्यशक्तींना दोन पिढ्यांमधूनसुध्दा खरा वारसदार लाभला नाही. त्यांच्या नाट्यकृतींचे मूल्यमापन करताना मराठी नाट्यसमीक्षेने कधी त्यांची दोष वैगुण्ये दाखविण्याच्या मिषाने तर कधी गडकऱ्यांच्या नाट्यप्रतिभेचे मुक्तकंठाने गुणगान करण्याच्या भरात त्यांच्या नाट्यकृतींचे खरे सामर्थ्य उलगडता उलगडता ते तसेच ठेवले. फार तर काही सामर्थ्यांना एखाद दुसरा स्पर्श केला आणि काही समीक्षकांनी तर आपल्या समीक्षेचा डोलारा गडकऱ्यांच्या वैयक्तीक जीवनातील घटनाप्रसंगांवर उभारला.

राम गणेश गडकरी यांच्या जीवनात घडलेल्या घटना आणि त्यांच्या काव्यनाट्यातून आलेले प्रसंग यात अशा समीक्षकांच्या दृष्टीने काही साम्य असेलही पण घटनांच्या केवळ साम्यातून साहित्यकृतीची श्रेष्ठता सिध्द होत नसते. याचे भान अशा समीक्षकांना राहत नाही. त्यामुळे आपण त्यांच्या साहित्यावर एकप्रकारे अन्याय करतो.

त्यांच्या नाटकांची वैशीष्ट्ये पाहत असताना त्यांच्या जीवनाची उलटसुलट निरीक्षणे करुन ती पाहण्यापेक्षा प्रत्यक्ष नाट्यवस्तुच्या अंतरंगातून ती न्याहाळणे अधिक न्यायाचे आणि श्रेयस्कर ठरेल. गडकऱ्यांनी आपल्या नाटकांना संसार नाटके म्हटले आहे. त्यांच्या नाटकातील नायक नायिका साधारणपणे विशीपंचविशीतील आहेत. या पात्रांच्या विशिष्ट वयोमानांचे, त्यांच्या हातून घडणाऱ्या प्रमादांचे, त्यांनी बाळगलेल्या ध्येयांचे, स्वप्नांचे आणि वाट्याला येणाऱ्या सुख दुःखाचे एक आंतरिक नाते आहे असे सतत वाटत राहते. या प्रमादशील, अस्वस्थ, उन्मत व स्फोटक वयोमानातील माणसेच आततायी, आत्मघातकी, बेभान व परपिडक असू शकतात असे नाही तर ही माणसे अतिशय उदात्त, कोमल, निर्धारशील, सत्वशील, त्यागमय आणि गंभीर जीवन जगू शकतात हे गडकऱ्यांच्या इतके कोणीही दाखविलेले नाही.

राम गणेश गडकरी यांच्या प्रतिभेची झेप इतकी उंच आणि उत्तुंग आहे की, नुसत्या त्या झेपेत येवू पाहणाऱ्या जीवननाट्याला जरी न्याहाळले तरी आपण थक्क होवून जातो. खरंच गडकऱ्यांच्या रुपाने मराठी नाट्यसृष्टीला एक विलक्षण चित्तवेधक लेणे लाभले आहे. त्यांच्या नाटकांची वैशिष्ट्ये म्हणजे

१) त्यांची कथानके, पात्रांच्या व्यक्तीमत्व दर्शनाला शरण गेलेली आहेत.
२) हे व्यक्तीमत्वदर्शने अतिबौद्धिकतेचा पांगुळगाडा डावलून अतिशय सुजाणपणे भावात्मक झाले आहे.
३) त्यांची नाटके एका अंगाने व्यक्तिचे मनोमंथन करत करत विकासू पाहतात तर दुसरीकडे नैतिक, आत्मीक समस्यांचे उलटसूलट फासे मांडून संसाराचा सारीपाट कसा बिकट आहे याचे दर्शन घडवतात.

४) गडकऱ्यांची सारी नाटके पंचाक्षरी आहेत. उदा. प्रेमसंन्यास, राजसंन्यास, पुण्यप्रभाव, एकच प्याला, भाव...

गडकऱ्यांनी नाट्यवस्तुला एकाच वेळी अंतर्मुख आणि बहिर्मुख करण्याचा धाडसी प्रयत्न केला आहे. कदाचित यामु... त्यांची पात्रे अंतर्यामी राम गणेशांचा आत्मप्रत्यय सजवूनच बोलत आणि वाढत राहिले. असे करणे गौणपणाचे मानले जाते; पण गड... त्याची पर्वा नसावी कारण गडकरी एक मनस्वी कलांवत होते. प्रारंभापासून शेवटपर्यंत वृत्तीने कवी होते. म्हणूनच पात्रांच्या ... गडकऱ्यांनी आपल्याला हवी तशी काव्यात्म बनविली. कवितेत आणि नाटकात त्यांनी बोलभाषेचा दुस्वास केला असे नाही. '... भाषायोजना' हा त्यांचा मूळ प्रकृतीपींड होता. त्यांच्या जीवनव्यवहारात हा पिंड मूरला होता. त्यांनी प्राचीन वाङमय आणि ... वाङमयाचा खूप अभ्यास केला होता. त्याकाळच्या परिस्थितीतही तो दिसून येतो.

मराठी नाटकाला गडकऱ्यांनी भावात्म मनोकामनेत मुक्त संचारी बनविले. प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव व एकच प्याला या ती... त्यांनी नाट्यसृष्टीवर अनोखा प्रभाव टाकला. काव्यात्मकता हा गुण त्यांच्या कवीवृत्तीतून नाटकात प्रकटला. कवितेत अंतर्मुख... सोबतच त्यांच्या प्रतिभेला बाह्य विश्व आणि वैयक्तिक अंतर्विध यांचे संवादी व विसंवादी संबंध प्रकट केले. भावात्मकतेच्या दृष्टीने कुठलाही एकसूरीपणा त्यांच्या नाटकात दिसत नाही. ही भावात्मकता विविध स्तरांतून अभिव्यक्त होते. त्यां... १) रोमँटिक ड्रामा, २) सेंटिमेंटल ड्रामा आणि, ३) सिरिकल ड्रामा यांचे एक चमत्कारीक मिश्रण झालेले आहे. कल्पनानि... व्याकूळता, गाढ आत्मपरता हे त्यांचे विशेष होत. कधी कधी त्या नाटकाला गडकऱ्यांनी 'फार्स' ची उग्र फोडणी ही दिली. त्या... परिणामाला कधी गहिरेपणा आला तर पुष्कळवेळा ते ओशाळलेही. गडकऱ्यांच्या नाटकांचा एक आणखी विशेष सांगायचा झाल्या... जसे नाट्यतंत्र वापरता येते तसेच नाटकात कांदबरी तंत्र वापरणे अशक्य नाही. अनुचितही नाही. इंग्रजीत ज्याला 'डबल ... (द्विदालनात्मक नाटक) म्हणतात तशी गडकऱ्यांची नाटके आहेत. विशेषत: एकच प्याला. कांदबरी तंत्राच्या साह्याने दु... कथानकाचा खेळ मांडून नाट्यवस्तुला व्यष्टीपरिघातून समष्टी परिधान जावून पसरट होता येते. मनोमंथनासाठी आंत आंत ... प्रेक्षकाला प्रत्यक्षताबरोबरच परोक्षाच्याही क्षेत्रात हिंडवत येते हे गडकऱ्यांनी फार समर्थपणे दाखवून दिले.

गडकरी व त्यांची नाटके मराठी सांस्कृतिक जीवनाचे एक अंग होवून राहिली आहेत. एकतर गडकऱ्यांच्या नाटकाची ... मराठी समाजाच्या पंरपरेतून निर्माण झालेल्या काही जीवनमूल्यांचे पुन:पून्हा निदर्शन करणारी आहे. त्यात केव्हा गौरव तर केव्हा ... केव्हा उपहासयुक्त टीका तर केव्हा फक्त चिकित्सा केलेली दिसते. प्रेम, त्याग, संन्यास, पतिव्रत्य, वात्सल्य, मैत्री, एकनिष्ठा ही ... वारंवार जोखून पाहतात. तेव्हा त्यांना समाजाच्या वर्तनात की कोठे रूजलेली, फुललेली दिसतात तर कोठे कोमेजलेली, पुजलेली ... ही जीवनमूल्येच गडकऱ्यांच्या व त्यांच्या नाटकातील पात्रांच्या जीवनविषयक चिंतनचक्राला गती देतात. तसेच गडकरी हे महाराष्ट्राच्या संस्कृ... एक मानचिन्ह होवून बसले ते आपल्या भाषासामर्थ्याने. सात शतकांच्या काळातील ज्ञानदेव तुकारामापासून तर विष्णूशास्त्री चिपळूणकरांप... गडकऱ्यांनी इतके थोडे लिहून एवढे मोठे अनन्यसाधारण स्थान प्राप्त केले.

संतसाहित्य, बखर वाङमय आणि शाहिरी कविता गडकऱ्यांनी आत्मसात केली होती. आपल्या भाषेला मोहिनी आणि सा... देण्यासाठी त्यांनी अनेक क्लृप्त्यांचा उपयोग केला. प्रतिमा, रुपके. प्रास, अनुप्रास, चेतनगणोक्ती यांचा एवढा विपुल आणि सतत वापर ... केला की गडकऱ्यांचे हे भाषावैभव पाहून तिच्या अर्थवत्तेची व परिणामाची जाणीव होते. त्यांच्या वाक्यरचनेला एक अंतर्गत तोल आहे. आ... जेव्हा ती पूर्ण काव्यात्म बनते तेव्हा तिच्यातील सुंदर लय प्रत्ययास येते.

गडकरी हे भाषाप्रभू होते. "एणे वाग्यज्ञे तोषावे" ही ज्ञानेश्वरांची उक्ती त्यांनी आपल्या लेखनाने सार्थ करुन दाखविली. त्या... भाषेचा डौल आणि दिमाख काही औरच आहे. मराठी भाषेचे अंत:सामर्थ्य त्यांनी पुरेपूर ओळखले होते. म्हणूनच एखाद्या नाट्यप्रसंगाला जि... करण्यासाठी भाषेची जी संजीवनी पाहिजे असते ती गडकरी देवू शकले. त्यांनी आपल्या भाषावैभवाची नूसतीच उधळण केली नाही तर ... उपयोग आपला अस्तित्वानुभव, त्यांसी संगत असलेले, जगत अस्तित्व आणि त्यांच्या संबंधातून निर्माण झालेले जीवन ...

...कारणासाठी केला. ते करण्यासाठी त्यांनी जी पात्रे निर्मिती, त्यांचे जे भावबंध रचले व ज्या घटनांतून ते प्रचित केले ती पात्रे त्यांचे संबंध ...या घटना यांचा वेध घेणे म्हणजेच गडकऱ्यांच्या नाटकांचे व त्यातून प्रकटलेल्या मराठी सांस्कृतिक जीवनाचे रुप न्याहाळणे होय. हे ...शीलन करताना गडकऱ्यांच्या नाटकांतील व्यक्ती चरित्राशी जखडलेल्या संघर्षात्मक परिघाचा व्याप आणि त्याची जटिलता पाहणे ...श्यक आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या नाटकातून व्यक्त झालेली काव्यात्मता त्या जीवनाचे एक महत्वाचे अंग आहे. ते भानही ठेवावे लागते. ...च्या खेळात प्रचंड उत्कट असते. संदिग्ध आणि फसवी सुखाची अपेक्षा असते. अणूपासून ब्रह्मांडाएवढे परोपरीचे दुःख असते. स्त्री-...ची प्रीती व त्या प्रीतीचे अकल्पनीय चित्र विचित्र पर्याय असतात. त्यांच्या द्वेषाच्या व कौर्याच्या तऱ्हा कधी उघड्या नाघड्या तर कधी ...द पाकीव असतात. त्यांच्या आशा आकांक्षा परस्परांना टकरा देतात. निराशा, विफलता, अवेहलना इ. ना. या खेळात बिलकूल मज्जाव ...तो.

### तात्पर्य

भाषाशैलीने गडकरी महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा ठरले. काशीची गंगा आणि रामेघराचा सागर एकत्र आणून शीवछत्रपतींनी ...णे रायगडावर 'गंगासागर' तलाव तयार केला त्याप्रमाणे भारतीय संस्कृतीचे पावित्र्य आणि मराठी भाषेचे सौंदर्य एकत्र आणून राम ...गडकरी यांनी महाराष्ट्रात 'साहित्यसागर' निर्माण केला.

### संदर्भ सूची


१) प्र. के. अत्रे — संपूर्ण गडकरी

२) वि. स. खांडेकर — गडकरी व्यक्ती आणि वाङ्मय

३) म. श्री. पंडित — गडकऱ्यांची खरी भूमिका

४) गो. नि. दांडेकर — मराठी नाट्यसृष्टी खंड १/२

५) लोकराज्य — गडकरी विशेषांक १९८५

६) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास — संपा. अ. ना. देशपांडे